N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** यावल **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0051 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/01/2021 23:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 19/01/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/01/2021

**Time From (वेळेपासून):** 13:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/01/2021 **Time (वेळ):** 19:03 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 024 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/01/2021 19:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.200 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय यावल ये

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** शेख निसार शेख युसुफ

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1959 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मिल्लत नगर फैजपुर ता यावल ,यावल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मिल्लत नगर फैजपुर ता यावल ,यावल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव). | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सिकंदर सायबु तडवी | | | 1. बिडगाव ता चोपडा जि जळगाव,यावल, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावल पोस्टे भाग6गुरन 08/2021 भ्रष्टाचार प्रतीबंध (सुधारित) कायदा सन 2018 चे कलम 7 मी शेख निसार शेख युसुफ, वय -62 , व्यवसाय - सेवानिवृत्त रा मिल्लत नगर फैजपुर ता यावल जि. जळगांवसमक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. मी जिल्हा परीषद जळगाव अंतर्गत उर्दु कन्या कन्या शाळा नं. 2, फैजपुर येथे शिक्षक म्हणुन नोकरीस होतो. सेवा कालावधी पुर्ण करुन मी दि. 01/05/2016 रोजी मी नियमानुसार सेवानिवृत्त झालो आहे. सन 2006 मध्ये राजा लिलाई अ गृहनिर्माण संस्था, फैजपुर या सोसायटीचा मी सदस्स्य होतो. सदर संस्थेमार्फत शासनाकडुन गटविमा योजने अंतर्गत घरबांधणीकरीता कर्ज म्हणुन 3,51,000/- रुपये मंजुर झाले होते. सदर कर्ज 03 टप्प्यांमध्ये मिळाले होते. सदरचे कर्ज मी दि. 26/08/2020 रोजी चलनाद्वारे भरणा केले आहे. सदर कारणामुळे माझी कायम स्वरुपीची पेन्शन व इतर पैसे शासनाने थांबवुन ठेवले होते. ते आता मला मिळावे म्हणुन मी दि. 19/11/2020 रोजी मा. गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती यावल यांचेकडे अर्ज दिलेला आहे. सदर बाबत चौकशीसाठी मी अधुन मधुन सदर कार्यलयात गेलो असता माझे सदर काम कार्यलयातील सिकंदर तडवी, यांचेकडे प्रलंबित असल्याचे समजले. त्यानंतर मी सिकंदर तडवी यांना वेळा भेटलो. त्यांनी मला नंतर येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी दि. 15/01/2021 रोजी पंचायत समिती कार्यालय, यावल येथे जावुन सिकंदर तडवी यांना भेटलो व माझे पेन्शन व उपदान प्रस्तावाबाबत सांगितले असता त्यांनी माझे पेन्शन व उपदान प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठिवण्याच्या मोबदल्यात माझे कडेस 3,000/- रुपयाची मागणी केली. त्याशिवाय तुमचे काम होणार नाही. असे सांगितले. तेव्हा माझे पेन्शन व उपदान बाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्याच्या मोबदल्यात सिकंदर तडवी हे माझ्याकडेस लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. त्या संदर्भात मी दि. 18/01/2021 रोजी अंटी करप्शन ब्युरो, जळगाव कडील पोलीस निरीक्षक श्री. एस.के. बच्छाव यांचेकडे लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. 19/01/2021 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. जी.एम.ठाकुर , पो.नि. एस.के. बच्छाव, दोन सरकारी पंच व सापळा पथकासह यावल येथे आले होते. त्यानंतर पो.नि. एस.के. बच्छाव यांनी दोन्ही पंचांचे व माझे वक्तव्ये डिजीटल व्हाईस रेकर्डर मध्ये ध्वनी मुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. एस.के. बच्छाव यांनी मला व पंच क्र. 1 यांचेसह सिकंदर तडवी यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, यावल येथे 13.55 वा. पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र. 1 यांचेसह पंचायत समिती कार्यालय, यावल येथे गेलो तेव्हा मी हाताचे इशा-याने सिकंदर तडवी यांना नमस्कार केला. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे त्यांचे टेबल समोरील खुर्चीवर बसलो. तेव्हा माझी व सिकंदर तडवी यांचेशी माझ्या पेन्शनच्या प्रस्तावाबाबत चर्चा झाली. तेव्हा सिकंदर तडवी यांनी माझेकडे 3,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी सिकंदर तडवी यांना 3,000/- दिल्यानंतर माझे काम कम्प्लीट होईल का होणार नाही असे विचारले असता सिकंदर तडवी यांनी तुमचे काम कम्प्लीट का नाही होणार आम्ही कशासाठी काम करतो आहे. इथे असे सांगितले. तेव्हा मी सिकंदर तडवी यांना केव्हा येवु असे विचारले असता सिकंदर तडवी यांनी मला उद्या सकाळी 10.00 वा. येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे सापळा पथकाजवळ 14.34 वा. परत आलो. सदरचे

संभाषण डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये ध्वनी मुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पो.नि. एस.के.बच्छाव मला दि. 20/01/2021 रोजी सकाळी 10.00 वा. यावल शहरातील एस.टी. बस स्टण्ड मध्ये असलेल्या संरक्षक भिंतीजवळ उपस्थित राहण्यास सांगितले होते. तसा दि. 19/01/2021 रोजी सविस्तर पंचनामा केला आहे. पो.नि. एस.के. बच्छाव यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि. 20/01/2021 रोजी यावल शहरातील एस.टी.बस स्टण्ड मध्ये असलेल्या संरक्षक भिंतीजवळ हजर झालो. त्यानंतर मी सिकंदर तडवी यांना देण्यासाठी माझे घर खर्चातील घरुन आणलेले 3,000/- रुपये रक्कम (त्यात 500/- रुपये दराच्या 06 नोटा) पो.नि.श्री. बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केली. सदर नोटांना अ.पा. पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टाच्या वरील डावे खिशात अलगद ठेवुन दिल्या होत्या तसा दि. 20/01/2021 रोजी सविस्तर पंचनामा केला आहे. त्यानंतर पो.नि. एस.के. बच्छाव यांनी दोन्ही पंचांसमक्ष डिजीटल व्हाईस रेकर्डींग मध्ये नवीन सेल व नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन मला पंच क्र. 1 यांचेसह पंचायत समिती कार्यालय, यावल येथे सिकंदर तडवी यांना लाचेची रक्कम देण्याकरीता पाठविले होते. तेव्हा मी व पंच क्र. 1 असे यावल पंचायत समिती कार्यालयात गेलो. तेव्हा माझी व सिकंदर तडवी यांचेशी माझ्या पेन्शनच्या प्रस्तावाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी माझ्या शर्टाच्या वरील डाव्या खिशातील लाचेची रक्कम 3,000/- रुपये उजव्या हाताने बाहेर काढुन ती सिकंदर तडवी यांचे समोर धरली. व सदरची रक्कम सिकंदर तडवी यांना देवु केली असता सिकंदर तडवी यांनी त्यांच्या उजव्या हाताच्या इशा-याने लाचेची रक्कम घेण्यास नकार देवुन मला सदर लाचेची रक्कम पुन्हा खिशात ठेवण्यास सांगितले. तेव्हा मी सदरची रक्कम पुन्हा माझे शर्टाचे वरील डाव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे सापळा पथकासह परत आलो होतो. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये ध्वनी मुद्रीत करण्यात आले आहे.त्यावेळी मी पो.नि. एस.के. बच्छाव यांना सांगितले की, मी व पंच क्र. 1 असे सिकंदर तडवी यांना भेटण्यासाठी गेलो तेव्हा त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही. यावरुन तसेच त्यांच्या देह बोलीवरुन त्यांना माझे विषयी संशय आलेला असावा त्यामुळे सिकंदर तडवी हे माझेकडुन आता लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत नाही. त्यामुळे पो.नि. एस.के. बच्छाव यांनी सदरची कारवाई स्थगित केली होती. त्यानंतर पो.नि. एस.के. बच्छाव यांनी मला सिकंदर तडवी यांनी पैसे मागणी केल्यास तात्काळ आमच्याशी मोबाईल फोनवर संपर्क साधणे बाबत सांगितले होते. त्यानंतर मी सापळा कारवाईच्या वेळी लाचेची रक्कम 3,000/-(त्यात 500/- रुपये दराच्या 06 नोटा) सदरच्या नोटा बदलवुन दुस-या 500/- रुपये दराच्या 06 नोटा असे एकुण 3,000/- रुपये मला पो.नि. एस.के. बच्छाव यांनी परत दिले होते. तसा दि. 20/01/2021 रोजी सविस्तर पंचनामा केला आहे. त्यानंतर मी दि. 25/01/2021 रोजी पो.नि. एस.के. बच्छाव यांचेशी संपर्क साधुन कळविले होते की, मी आज रोजी यावल येथे गेलो असता मला सिकंदर तडवी हे भेटले व त्यांनी मला सांगितले की, तुमचे पेन्शन व उपदानाचे काम होवुन जाईल, आता तुम्ही पैसे देण्याची गरज नाही. व तुम्हाला आता आफिसमध्ये येण्याची आवश्यकता नाही. तुमच्या पत्त्यावर परस्पर पत्र येईल, असे मला सांगितले. त्यावरुन सिकंदर तडवी हे आता माझे कडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाही. अथवा माझेशी संपर्क करणार नाहीत सिकंदर तडवी यांच्या वागणुकीवरुन व त्यांच्या देह बोलीवरुन त्यांना माझा संशय आलेला असावा म्हणुन सिकंदर तडवी हे माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. तरी सिकंदर तडवी यांचे विरुध्द आपले स्तरावर पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही व्हावी बाबत दि. 25/01/2021 रोजी जबाब दिला आहे. त्या अनुषंगाने आज दि. 27/01/2021 रोजी मला अंटी करप्शन ब्युरो, जळगाव कार्यालयात बोलविण्यात आले. त्यानंतर मी पो.नि. एस.के. बच्छाव दोन्ही पंच व सापळा पथक असे आम्ही पंचायत समिती कार्यालय, यावल येथे गेलो तेव्हा मी सदर कार्यालयात सिकंदर तडवी हे हजर असल्याचे पो.नि. एस. के. बच्छाव यांना सांगितले. त्यावेळी पो.नि. एस.के. बच्छाव यांनी सिकंदर तडवी यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगुन सिकंदर तडवी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. एस.के. बच्छाव यांनी सिकंदर तडवी यांना त्यांचे पुर्ण नाव ,पद व पुर्ण पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सिकंदर सायबु तडवी, वय-56, व्यवसाय-नोकरी, वरिष्ठ सहाय्यक शिक्षण विभाग, पंचायत समिती कार्यालय, यावल रा. बिडगांव ता. चोपडा जि.जळगाव असे असल्याचे सांगितले.अशा प्रकारे सिकंदर सायबु तडवी, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग पंचायत समिती कार्यालय, यावल यांनी माझे पेन्शन व उपदान मिळण्यासाठीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्याच्या मोबदल्यात आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन गैरमार्गाने माझे कडेस दि. 19/01/2021 रोजी 13.55 ते 14.35 वा. चे दरम्यान पंचायत समिती कार्यालय, यावल येथे 3,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली सदरची फिर्याद मराठी भाषेत असुन ती मला समजली सदरची फिर्याद माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष फिर्याद देणा-याची सही.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** PCMH68697 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

पोलीस निरिक्षक
यावल पोलीस स्टेशन

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस निरीक्षक
यावल पोलीस स्टेशन

पो. ठाणे अं
यावल,पो. स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SUDHIR Bhimrao PATIL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN77433